प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai 400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

ऑगस्ट 28, 2015

**आरबीआयच्या नाणेविषयक वस्तुसंग्रहालयामध्ये म्हैसूरच्या नाण्यांच्या खास प्रदर्शनाचे अनावरण**

ऑगस्ट 20, 2015 रोजी, भारतीय रिझर्व बँकेच्या नाणेविषयक वस्तुसंग्रहालयात म्हैसूरच्या नाण्यांच्या खास प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. डॉ. दीपाली पंत जोशी, कार्यकारी संचालक हयांनी हया खास प्रदर्शनाचे उदघाटन केले. हया प्रसंगी, म्हैसूरच्या नाण्यांच्या प्रदर्शनावरील एक 20 पानी पुस्तिकाही वितरित करण्यात आली. श्री यु एस पालीवाल, (कार्यकारी संचालक), प्रो. दामोदर आचार्य (रिझर्व बँकेच्या केंद्रीय संचालक मंडळावरील संचालक) आणि श्री. एस रामस्वामी (मुंबई कार्यालय) हे देखील उपस्थित होते.




आरबीआयच्या नाणेविषयक वस्तुसंग्रहालयामधील म्हैसूरच्या नाण्यांचे खास प्रदर्शन

हया प्रदर्शनात म्हैसूरच्या 112 नाण्यांचा समावेश असून (13 सोन्याची नाणी, 6 चांदीची नाणी व 93 तांब्याची नाणी). त्यामधून, तालिकोटच्या लढाईनंतरचा इ.स. 1565 पासून चार शतकांचा इतिहास उलगडला जातो. म्हैसुरचे वाडियार, हैदरअली, टिपु सुलतान हयांच्या अंमलाखालील नाण्यांवर हे प्रदर्शन जोर देते. म्हैसुरच्या राजांच्या अंमलाखालील सोन्याची नाणी बहुसंख्येने दिसून आली. कंठीरवा नरसरैय्या हा सोन्याची नाणी प्रसृत करणारा सर्वप्रथम राजा होता. त्या नाण्यांना कंठीरवा वराह व अर्ध वराह म्हटले जात होते व त्यांची वजने अनुक्रमे 3.5 ग्राम व 1.7 ग्राम होती. त्यावर एका बाजूवर लक्ष्मी नरसिंहाची प्रतिमा व दुस-या बाजूवर, त्याचे नाव असलेला तीन ओळींचा मजकूर होता. हया राजाने, सोन्याचे पानम (वजन 0.35 ग्रा.) सुरु केले. त्याच्या एका बाजूवर नरसिंह व दुस-या बाजूवर त्याचे नाव होते. तिस-या कृष्णराजाच्या राजवटीमध्ये (इ.स.1799 ते 1832) दिवाण पूर्णयाने गिड्डा कंठीरवा पानम (गिड्डा म्हणजे जाड) पुनः सुरु केले. ही प्रथा हैदर अली व टिपु सुलतान हयांच्याही राजवटीत सुरु राहिली.

हे सर्व पाहण्यासाठी आणि अधिक माहितीसाठी, आरबीआयचे नाणे संग्रहालय, अमर बिल्डिंग (तळ मजला), सर पी. एम. रोड, मुंबई - 400 001 ला भेट द्या. वेळ - सकाळी 10.45 ते संध्याकाळी 5.15. मंगळवार ते रविवार. सोमवार व बँक सुट्टीच्या दिवशी बंद.

**अल्पना किल्लावाला**
प्रधान मुख्य महाव्यवस्थापक

**वृत्तपत्रांसाठी निवेदन 2015-2016/519.**